# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

| तक्रार क्रमांक-१०७/२०२१/नंदुरबार<br>व्दितीय अपील क्र.- १६९०/२०१८/नंदुरबार | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | |
| १. | श्री.राजेश्वर हिरामण सामुद्रे,सिध्दार्थ नगर,कुळडेल,ता.शहादा,जि.नंदुरबार. | तक्रारदार |
| | विरूद्ध | |
| १. | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,असलोद,ता.शहादा,जि.नंदुरबार | उत्तरवादी क्र.१ |
| २. | विस्तार अधिकारी(ग्रामपंचायत),पंचायत समिती कार्यालयशहादा, ता.शहादा,जि.नंदुरबार. | उत्तरवादी क्र.२ |

(निर्णय दिनांक ०२/०७/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०३/२०२१ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.आयोगाने व्दितीय अपील क्र.-१६९०/२०१८/नंदुरबार संदर्भात दिनांक १७/११/२०२० रोजी झालेल्या सुनावणीअंती आदेश पारीत केलेले आहेत. तथापि, सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,असलोद,ता.शहादा,जि.नंदुरबार यांनी कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध अभिलेखावरुन आयोगास असे निदर्शनास येते की,आयोगाने व्दितीय अपील क्र.- १६९०/२०१८/नंदुरबार संदर्भात दिनांक १७/११/२०२० रोजी झालेल्या सुनावणीअंती पारीत केलेल्या आदेशांनुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, असलोद, ता.शहादा,जि.नंदुरबार यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्र.- १६९०/२०१८/नंदुरबार संदर्भात दिनांक १७/११/२०२० रोजी झालेल्या सुनावणीअंती पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. उप मुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत विभाग, जिल्हा परीषद कार्यालय, नंदुरबार,ता.जि. नंदुरबार यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. **१०७/२०२१/नंदुरबार** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

तक्रार क्रमांक-**१०७/२०२१/नंदुरबार** /जावक क्र.८४३५ दिनांक- ०६/०८/२०२१

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद कार्यालय, नंदुरबार,ता.जि. नंदुरबार

२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत विभाग, जिल्हा परीषद कार्यालय, नंदुरबार,ता.जि. नंदुरबार

३) निवडनस्ती.